लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूमसची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ४३ वा | रविवार, दि. ०१ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



# सोलापूर जिल्ह्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

## 6 ते 30 ऑगस्ट 2024 च्या दरम्यान 75 हजार 824 मतदारांची वाढ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अंतिम मतदार यादी दि. 30 ऑगस्ट 2024 रोजी प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. अंतिम मतदार यादीत एकूण 37 लाख 63 हजार 789 मतदार आहेत. 6 ऑगस्ट ते 30 ऑगस्ट या दरम्यान एकूण 75 हजार 824 मतदारांची वाढ झालेली आहे. अंतिम मदार यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खात्री करावी, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.

दिनांक 6 ऑगस्ट 2024 च्या प्रारूप मतदार यादीमध्ये एकुण 36 लाख 92 हजार 409 इतकी असून यामध्ये पुरूष 19 लाख 8 हजार 146, महिला 17 लाख 83 हजार 966 व इतर–297 मतदारांचा समावेश होता. दि. 30 ऑगस्ट 2024 च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकुण 37 लाख 63 हजार 789 इतकी मतदार संख्या असून यामध्ये पुरूष–19 लाख 35 हजार 979, महिला– 18 लाख 27 हजार 508 व इतर 302 मतदारांचा समावेश आहे.

सोलापूर जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी अंतिम तयार झाली असून विधानसभा मतदारसंघ, मतदान केंद्र संख्या निहाय आकडेवारी –

244 करमाळा– एकुण 3 लाख 24 हजार 35, पुरुष 1 लाख 69 हजार 390 महिला 1 लाख 54 हजार 633 अन्य 12 तर 4737 मतदारांची वाढ झाली. तसेच 347 मतदान केंद्र आहेत.

245 माढा– एकुण 3 लाख 44 हजार 547, पुरुष एक लाख 80 हजार 547, महिला एक लाख 63 हजार 997 अन्य 3 तर मतदार संख्येत झालेली वाढ 5 हजार 339 तसेच मतदान केंद्र संख्या 355 आहे.

246 बार्शी एकुण 3 लाख 27 हजार 657, पुरुष एक लाख 69 हजार 100, महिला एक लाख 58 हजार 516 अन्य 41 तर झालेली वाढ 4719 तसेच मतदान केंद्राची संख्या 333 इतकी आहे.

247 मोहोळ (अ.जा) 3 लाख 25 हजार 999, इतकी मतदार संख्या असून मतदान केंद्राची संख्या 336 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 70 हजार 840 महिला एक लाख 55 हजार 151 अन्य आठ तर मतदारांची झालेली वाढ 4762.

248 सोलापूर शहर उत्तर – 3 लाख 22 हजार 668 इतके एकूण मतदार आहेत तर मतदान केंद्रांची संख्या 289 इतकी आहे. पुरुष मतदार 160198, महिला एक लाख 62 हजार 425 तर अन्य 45. वाढ झालेल्या मतदारांची संख्या 8199.

249 सोलापूर शहर मध्य– 3 लाख 39 हजार 608 एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्राची संख्या 304 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 67 हजार 662, महिला एक लाख 71 हजार 894 अन्य 52 तर वाढ झालेल्या मतदारांची संख्या 9947.

250 अक्कलकोट– 3 लाख 74 हजार 536 एकूण मतदार असून मतदान केंद्राची संख्या 390 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 92 हजार 819, महिला एक लाख 81 हजार 676 अन्य 41. मतदार संख्येत झालेली वाढ 10171.

251 सोलापूर दक्षिण– 3 लाख 72 हजार 553 एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्रांची संख्या 362 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 91 हजार 610, महिला मतदार एक लाख 80 हजार 905 अन्य 38 तर मतदार संख्येत झालेली वाढ 10566.

252 पंढरपूर– 3 लाख 65 हजार 725 एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्रांची संख्या 357 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 87 हजार 889, महिला एक लाख 77 हजार 810 अन्य 26 तर मतदार संख्येत झालेली वाढ 5874.

253 सांगोला– 3 लाख 22 हजार 240 एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्रांची संख्या 305 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 67 हजार 777 महिला एक लाख 54 हजार 458 अन्य 5 तर मतदार संख्येत झालेली वाढ 6619.

254 माळशीरस (अ.जा)– 3 लाख 44 हजार 221 एकूण मतदार संख्या असून मतदान केंद्राची संख्या 345 इतकी आहे. पुरुष मतदार एक लाख 78 हजार 147, महिला एक लाख 66 हजार 43 अन्य 31 तर मतदार संख्येत झालेली वाढ 4891.

जिल्ह्यातील एकूण 11 विधानसभा मतदारसंघात 3723 मतदान केंद्र असून एकूण 37 लाख 63 हजार 789 मतदार संख्या आहे.

6 ऑगस्ट ते 30 ऑगस्ट दरम्यान 75 हजार 824 इतक्या मतदाराची नोंदणी झालेली आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मध्ये एकुण 3617 मतदार केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करून 124 मतदान केंद्राची नव्याने वाढ होऊन मतदान केंद्राची संख्या 3723 झालेली आहे. एकुण 3723 मतदान केंद्रापैकी शहरी 1177 व ग्रामीण भागामध्ये 2546 मतदान केंद्राचा समावेश आहे.

तरी नागरिकांनी आपली नावे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट असल्याबाबतची खात्री करावी. तसेच ज्या नागरिकांची अजूनही मतदार यादीमध्ये नावे नसतील त्यांनी निरंतर प्रक्रीयेमध्ये नाव नोंदणी करू शकतात असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी मतदारांनी voters.eci.gov.in या संकेतस्थळावरून मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करू शकता. मतदार यादीसंदर्भात काही माहिती आवश्यक असलेल्या अथवा काही दुरूस्ती असलेस संबधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिल कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी कळविले आहे.

# माढ्यात महिला रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालय करावे – शिवसेनेच्या शिष्टमंडळाची आरोग्यमंत्र्याकडे मागणी

## प्रा.शिवाजीराव सावंताकडे निवेदन सादर

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा शहर शिवसेनेच्या वतीने माढा शहरामध्ये स्वतंत्र महिला हॉस्पिटल व उपजिल्हा रुग्णालय करण्यात यावे अशी मागणी आरोग्यमंत्री डॉ.तानाजीराव सावंत यांच्याकडे करण्यात आली.

आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांचे बंधु तथा शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांची शिवसेनेच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सदर निवेदनाची प्रत दिली.

माढा शहरात १ ग्रामीण रुग्णालय असून, सदरील ठिकाणी



५० खाटांचे स्वतंत्र नवजात शिशू व महिला रुग्णालय आणि माढा ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याची नागरिकांची मागणी आहे.

तरी माढा येथे ५० खाटांचे स्वतंत्र नवजात शिशू व महिला रुग्णालय आणि माढा ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्या संदर्भात आरोग्यमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी लक्ष देण्याची मागणी नमुद केली आहे. यावेळी जिल्हा दुध संघाचे माजी संचालक राजेंद्र चवरे, तालुका प्रमुख मुन्ना साठे, नगरसेवक अरविंद खरात, शिवसेना शहर प्रमुख भैया खरात, स्वप्नील खरात, शंभु चवरे,बप्पा पवार आदी उपस्थित होते.

# एमआयटी ज्युनियर कॉलेजच्या वतीने प्रार्थना फाउंडेशन येथे सर्व लाभार्थींना खाऊ वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयटी ज्युनियर कॉलेज सोलापूर यांच्यावतीने आज एमआयटी संस्थेच्या कार्यकारी अधिकारी आदरणीय प्रोफेसर सौ स्वाती कराड चाटे मॅडम यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला कॉलेजच्या वतीने प्रार्थना फाउंडेशन येथे सर्व लाभार्थींना खाऊ वाटप करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाची प्रस्तावना वंदना कोपकर यांनी केली प्रार्थना फाउंडेशन ची स्थापना आणि त्याची वाटचाल संस्थेचे अध्यक्ष



श्रीयुत प्रसाद मोहिते यांनी मुलांना विशद केली आणि आयुष्यात कुठलेही ध्येय साध्य करण्यासाठी एकाग्रता अपार कष्ट याची सांगड घाला असे आव्हान केले अध्यक्षीय समारोप कॉलेजचे प्राचार्य श्रीयुत राजकुमार गायकवाड सर यांनी केली याप्रसंगी बोलताना सरांनी प्रसाद मोहिते यांच्या कार्याची भरभरून स्तुती केली व आम्ही आपल्या मदतीस सदैव तत्पर राहू असे अभिवचन दिले अकरावी बारावी कॉमर्स चे विद्यार्थी याप्रसंगी उपस्थित होते पर्यवेक्षक शामसुंदर माने डॉक्टर गजधाने श्री सावळे हे याप्रसंगी उपस्थित होते मोरवंची येथील प्रार्थना फाउंडेशन येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

**कामिनी गांधी**
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेच्या उमेदवारीसाठी शरद पवारांना भेटून मागणी करणार- वसंतनाना देशमुख

## कासेगाव येथे विचारविनिमय बैठकीला वसंतनाना देशमुख यांच्या समर्थकांची मोठी गर्दी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघाची निवडणूक लढवावी अशी मागणी वारंवार कार्यकर्त्यांकडून होत असल्याने आपण विचार विनिमय बैठकीच्या माध्यमातून समर्थकांचा निर्णय घेतला असून लवकरच शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी करणार असल्याची माहिती ज्येष्ठ नेते वसंतनाना देशमुख यांनी दिली. या त्यांच्या निर्णयामुळे आगामी निवडणुकीत परिचारक गटाला मोठा फटका बसणार असल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.

पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हॉइस चेअरमन तथा कासेगाव जिल्हा परिषद गटाचे विद्यमान सदस्य वसंतनाना देशमुख यांनी पंढरपूर–मंगळवेढा विधानसभेची निवडणूक लढवण्याबाबत चाचपणी करण्यासाठी कासेगाव येथे विचारविनिमय बैठकीचे



आयोजन करून कार्यकर्त्यांची भूमिका जाणून घेतली.

यावेळी वसंतनाना देशमुख यांच्या कार्यकर्त्यांनी आणि दिग्गज नेते मंडळींनी निवडणूक लढवावी अशी आग्रही भूमिका मांडली.

यावेळी पंढरपूर–मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील दिग्गज नेतेमंडळींनी त्यांना पाठिंबा दिला.

या विचार विनिमय बैठकीच्या निमित्ताने देशमुख यांनी विधानसभेची तयारी सुरू केल्याचे दिसून येत आहे. यावेळी व्यासपीठावर माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, दीपक वाडदेकर, नगरसेवक सुरेश नेहतराव, महंमद वस्ताद यांच्यासह पंढरपूर–मंगळवेढा मतदारसंघातील राजाभाऊ कडलास कर नाथा काशीद सुशांत माने विठ्ठल झांजे शिवाजी कोळेकर नागेश कस्तुरे इरेश जोंधळे संजय राठोड आबा हंडे संतोष माने अण्णा पाटील शरद गावडे मंगळवेढा तालुक्यातील सरपंच उपसरपंच जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य सोसायटीचे चेअरमन ग्रामपंचायत सदस्य वअनेक नेते मंडळी तसेच वसंत नाना देशमुख प्रेमी कार्यकर्ते व कासेगाव येथील ग्रामस्थ ही मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मालवणला जाताना मनोज जरांगे पाटलांची सोलापूरला धावती भेट

## छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करून पत्रकारांशी संवाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे मालवणला जात असताना सोलापुरातील छत्रपती संभाजीराजे चौकात त्यांनी समाज बांधवांची धावती भेट घेतली. यावेळी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करून पत्रकारांशी संवाद साधला.

**हा पठ्ठ्या नक्की मेडल आणेल..!**

सोलापुरातील धनुर्धर साईराज हणमे याला शुभेच्छा देऊन जरांगे पाटील यांनी सत्कार केला. हा पठ्ठ्या मेडल घेऊन नक्की येईल हा विश्वास त्यांनी दाखवला. तुझा पहिला सत्कार मी करणार असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. साईराजच्या सत्कारानंतर त्यांनी



पत्रकारांशी संवाद साधला.

छत्रपतींच्या बाबत कोणीही राजकारण करू नये. ज्यांनी उद्घाटन केले त्यांचा काहीही दोष नाही. मात्र ज्यांनी पुतळा उभारणी केली त्यांना अटक करून कायमस्वरूपी शिक्षा दिली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, अंतरवाली सराटी या ठिकाणी झालेल्या बैठकीत जगातील सर्वात मोठ्या आंदोलनाची वर्षपूर्ती झाली त्यानिमित्त समाज बांधवांशी चर्चा झाली असे त्यांनी सांगितले.

विधानसभेबाबत आत्ताच भूमिका स्पष्ट करणे योग्य ठरणार नाही असे सांगताना योग्य वेळी नक्कीच सांगेन असे ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

मुस्लिम आरक्षणाबाबत प्रश्नावर उत्तर देताना सध्या मराठा आरक्षण विषय हा ज्वलंत आहे हा प्रश्न सुटला की मुस्लिम आरक्षणासाठी लढा उभारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी प्रश्नांसाठी नेहमीच तयारीत असल्याचे त्यांनी सांगितले.

**उपोषणावर ठाम**

जर मराठा आरक्षण प्रश्न सुटला नाही तर उपोषण करणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. यावेळी शिवछत्रपतींचा पुतळा कोसळल्या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करत असताना इतर विविध प्रश्नांवर मते व्यक्त केली.

यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुस्लिम समाज बांधवांची उपस्थितीत लक्षणीय होती. त्यानंतर मालवणच्या दिशेने प्रयाण केले. यावेळी सकल मराठा समाजाचे माऊली पवार, अमोल बापू शिंदे, राजन भाऊ जाधव, नानासाहेब काळे, विनोद डोंगरे, शिवाजीराव चापले, महेश पवार, अमोल भोसले, सचिन गुंड, दिनेश डोंगरे, सचिन पवार, चंद्रकांत पात्रे, पिंटू माने, बब्रुवान माने, देशमुख सतीश शिंदे, अजहर शेख, मतीन बागवान इत्यादी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Classified - छोटी जाहीरात**

**विक्री**
विविध डिझाईनचे फॅशनेबल स्ट्रेचेबल ब्लाउज विक्रीसाठी उपलब्ध. रेडिमेड ब्लाउज विक्रीचे प्रसिद्ध शॉप. रसगंध लेडीज वेअर, नवी पेठ, दिवेकर बेकरी समोर, सोलापूर
**मो - 9890232227**

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:** 9881361260

**विक्री**
गौरी व गणपती सण आनंदित होण्यासाठी जगदंब फॅमिलीच्या वतीने आसरा चौक कोकण फॅमिली टेरेस मध्ये गिफ्ट रोपं तसेच राजस्थान भागातील कलर दगड चे प्रदर्शन व विक्री संपर्क
९८५०२३९९९८

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**
सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, माकेर्टींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: 9591409911 / 9272021110

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**



संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)

# ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

**मुंबई :** ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे. १५ सप्टेंबरनंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय एण्ड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे. या कार्यालयाकडून नोव्हेंबर २००६ पूर्वी जारी करण्यात आलेल्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना अनुज्ञप्ती मानवी स्वरूपातच आहे. अशा अनुज्ञप्ती धारकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत या कार्यालयामध्ये येऊन आपले अनुज्ञप्तीचे संगणक प्रणालीमध्ये बॅकलॉग करून घ्यावे. व मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्माट कार्डमध्ये रूपांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे क्र. ९८



**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक

**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव ५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव ८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले १०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत) १२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा १८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत) २१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक २७) दुधावरील मलई २८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ २९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती ३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी ३९) घाई, गडबड ४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास ४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत) ५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

**शब्दकोडे क्र. ९७ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | ना | य | क | मे | टे | | म | ध्य | प्र | दे | श |
| धा | क | | च | ष | क | | नी | | शां | | रा |
| न | | मे | | | डी | म | | म | त | ल | ब |
| स | मा | धा | न | | | का | ज | ळ | | स्र्श | |
| भा | ल | | ग | जा | न | न | | व | त | | क |
| | व | जी | र | | व्व | | का | ट | क | स | र |
| खा | ण | | से | | द | म | ट | | दी | र | |
| री | | न | व | री | | क | स | दा | र | | द |
| क | र्ना | ट | क | | शू | र | | न | | स | ही |
| | | ख | | | र्प | | ग | व | ग | वा | |
| प | हा | ट | | ग | ण | प | ती | | ज | ल | द |
| र | व | | त | न | खा | | | | रा | | स |










# विधानसभेत मुस्लिम समाजाला किमान १५% उम्मेदवारी देण्याची मागणी

## सेक्युलरवादी मुस्लिम फ्रंटची सर्व पक्षांसोबत सकारात्मक चर्चा सुरु

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सर्व पक्षीयप्रमुख नेत्यांना मुस्लिम समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाच्या मुद्द्यावर सेक्युलरवादी मुस्लिम फ्रंटने औपचारिक पत्र पाठवले होते, त्याबाबत सकारात्मक चर्चा सुरु आहे. या पत्रात, मुस्लिम समाजाच्या 15% जनसंख्येच्या टक्केवारीनुसार विधानसभेच्या जागांची मागणी करण्यात आलेली होती. सेक्युलरवादी मुस्लिम फ्रंट हे सर्व पक्षीय मुस्लिम समाज प्रतिनिधींच्या एकत्रित समाजव्यासपीठ म्हणून ही मागणी स्वरूपात राज्यभर यात्रा घेऊन जात असून, वाढत असलेला पाठिंबा सर्वत्र राजकीय चर्चेचा विषय झाला आहे. असे ॲड मोहम्मद अफरोज मुल्ला यांनी पत्रकार परिषदेत सांगितले



अलीकडे पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाने महाविकास आघाडीला एकसंध समर्थन दिले होते, ज्यामुळे आघाडीला विजय प्राप्त झाला. तरीही, सध्याच्या परिस्थितीत मुस्लिम समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व शून्यगणिक आहे. विधान परिषदेत एकही सदस्य नाही, आणि लोकसभा मतदारसंघात देखील प्रतिनिधित्व नाही. मुस्लिम समाज महाराष्ट्रातील 65 विधानसभेच्या मतदारसंघांत निर्णायक ठरतो, तरीही त्यांच्या प्रतिनिधित्वाची अवस्था चिंताजनक आहे, या समस्येवर उपाय म्हणून, सेक्युलरवादी मुस्लिम फ्रंट आगामी विधानसभा निवडणुकीसाठी एक व्यापक यात्रा झाली आहे. यात्रा 30 ऑगस्ट 2024 रोजी शाहू स्मारक, कोल्हापूरयेथून सुरू झाली, 31 ऑगस्ट रोजी सोलापूर येथे येणार आहे, आणि पुढील ठिकाणी जाईल 1 सप्टेंबरः लातूर, 2 सप्टेंबरः उस्मानाबाद, 3 सप्टेंबरनांदेड, 4 सप्टेंबरःयवतमाळ, 5 सप्टेंबरः अमरावती, 6 सप्टेंबरःअकोला, 7 सप्टेंबरःबुलढाणा.

या यात्रेद्वारे, मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधित्वाच्या मुद्द्यावर व्यापक चर्चा जाणारअसून, सर्व राजकीय पक्षांना मुस्लिम समाजाच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार 15% उमेदवारी देण्याची मागणी अधिक बाळकटीने समाज म्हणून महाराष्ट्रा च्या राजकीय पटला वर आणली जाईल. 'मागणीला वाढता पाठिंबा पाहता व सुरु असणाऱ्या सकारात्मक चर्चा पाहता परिणाम स्वरूप समाजाला येणाऱ्या विधानसभे मध्ये जनसंख्या टक्केवारी नुसार १५% उम्मेदवारी मिळून समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व निश्चित निर्माण होत आहे." असेही यावेळी सांगण्यात आले.

या पत्रकार परिषदेस ॲड मोहम्मद अफरोज मुल्ला, ॲड हजरतअली बडेखान, शरीफ शेख, झाकीर शेख, बंदेनवाज सय्यद आदी उपस्थित होते.

# शिवरत्नच्या बीबीए महाविद्यालयाला नॅक पीअर टीमची भेट

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या बीबीए अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदेची (नॅक) तज्ञ समीतीने भेट देऊन महाविद्यालयातील विविध पैलूंची तपासणी केली. सदर समितीत दिल्ली येथील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (दिल्ली विद्यापीठ) चे कुलगुरू डॉ. अजयकुमार सिंग, चंडीगड येथील चंडीगड विद्यापिठाचे संचालक डॉ. निलेश अरोरा व तिरपुत्तूर (तमिळनाडू) येथील स्कॅर्ड हार्ट या अटॉनॉमस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मारिया अॅटोनी राज यांची बेंगळूरच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद या संस्थेने नियुक्ती केलेल्या त्रिसदस्यीय तज्ञ समीतीने महाविद्यालयाला भेट दिली. २९ व ३० ऑगस्ट या दोन दिवसांच्या भेटीत सदर समितीने महाविद्यालय परिसरातील ग्रंथालय, वसतीगृह, जिमखाना, कार्यालय, प्रशासकीय कार्यालय, प्रसाधनगृह, खेळाचे



मैदान, संगणक कक्ष या भोतिक सुविधांची तपासणी केली. सदर समिती शिवरत्न शिक्षण संस्थेचे संचालक खासदार धैर्यशील मोहिते -पाटील व अध्यक्षा सौ.शितलदेवी मोहिते पाटील, सचिव धर्मराज दगडे यांच्या सह महाविद्यालयाचे विकास समितीच्या सदस्यां बरोबर मिटिंग घेऊन महाविद्यालयाबाबत माहिती करून घेतली. तसेच महाविद्यालयाविषयी पुढील वाटचालीसाठी चर्चा झाली. तसेच सदर समितीने महाविद्यालाच्या माजी विद्यार्थी, पालक व सध्या प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मूल्यांकन समीतीने सादर केलेल्या अहवालानुसार नॅक संस्थेकडून नॅक दर्जा महाविद्यालयाकडे प्राप्त होईल अशी माहिती प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी दिली. नॅक समन्वयक म्हणून प्रा.भरत साठे यांनी काम पाहिले. दोन दिवस चाललेल्या या मूल्यांकन प्रणालीत प्रा.डॉ. विश्वनाथ आवड, सौ. शहजादी काही, अरूण एकतपुरे या महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य व प्रशासनाधिकारी आश्रब शेख यांनी उपस्थित राहून मूल्यांकन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सहकार्य केले. मूल्यांकन यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी व संस्थेतील सेवक यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षण हे समाज घडविणारी व्यवस्था आहे - केंद्रप्रमुख दिगंबर काळे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** शिक्षकांचे अध्यापन हे विद्यार्थी केंद्रित असावं त्यातून अध्यापनाचा हेतु स्पष्ट व्हावा विद्यार्थ्यांची जडणघडण अध्ययन निष्पत्तीतून सहज शक्य आहे त्यामुळे शिक्षकांनी अध्यापन करताना आपल्या इयतेच्या विषयांच्या अध्ययन निष्पत्ती चा चिकित्सकपणे अभ्यास करून मुलांच्यापुढे उभे राहावे त्यामुळे विद्यार्थी चांगले घडतील कारण शिक्षण हे समाज घडविणारी व्यवस्था आहे असे मत उपळाई बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी नंदिकेश्वर विद्यालयात झालेल्या शिक्षण परिषदेत व्यक्त केले ते पुढे म्हणाले शिकणे शिकवणे ही प्रक्रिया सुलभ करा



मुलांच्या शिकण्याच्या नेमक्या अडचणी समजून घ्या त्यावर चर्चा करून कृती आराखडा तयार करून शिकण्याची संधी उपलब्ध करून त्याच्यामध्ये एक विश्वास निर्माण करा कोणतीही परीक्षा कधीही घेतली तरी विद्यार्थी तत्पर असावा यासाठी प्रयत्न करावेत नंदिकेश्वर विद्यालयाचे शिक्षक यादव यांनी स्पर्धा परीक्षा संदर्भात मार्गदर्शन केले विठोबा गाडेकर निपुण वर तर श्रीकांत काशीद व धनाजी गाडगे यांनी दीक्षा ॲप वर मार्गदर्शन करून ते कसे वापरावे त्यातील लिंक कशा ओपन कराव्यात याबद्दल माहिती दिली उपस्थित सर्व शिक्षकांच्या मोबाईल मध्ये दीक्षा ॲप डाउनलोड करून दिले सर्व शिक्षकांनी अध्ययन निष्पत्ती वर कृती आराखडे तयार केले.

प्रथम सावित्रीबाई फुले यांच्याप्रतिमे चे पूजन केले प्रास्ताविक अनिल काळे यांनी तर आभार बचुटे यांनी मानले सूत्रसंचालन पांडुरंग शिंदे यांनी केले.

# युवा प्रतिष्ठान च्या दहीहंडी चा मानकरी यश चंदनशिवे

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** शिवछत्रपती क्रीडा व सांसकृतिक मंडळ संचलित युवा प्रतिष्ठानच्या मानाची दहीहंडी फोडण्याचा मानकरी यश चंदनशिवे ठरला आहे. बार्शी शहरातील कसबा पेठ मधील हांडे गल्लीत परंपरे नुसार दहीहंडी उत्सव साजरा केला जात आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनातून मागील १२ वर्षा पासून दहीहंडी उत्सवास मोठे स्वरूप देण्यात आले आहे.

बार्शी येथील युवा प्रतिष्ठानची ओळख प्रत्येकवर्षी आगळे वेगळे देखावे, सामाजिक उपक्रम या साठी आहे. एका बाजूला उत्सवाच्या निमित्ताने धांगडधिंगा व सेलेब्रिटी महिलांचा डान्स असेल प्रकार वाढत असताना कायम वेगळेपण जपणाऱ्या युवा प्रतिष्ठानने या वर्षी दहीहंडी उत्सवातून आजच्या युवकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

दहीहंडी उत्सवासाठी केवळ युवकांचा जल्लोष व धिंगाणा असे समीकरण न ठेवता शिवकालीन मर्दानी खेळाचे आयोजन केले होते. या मध्ये तलवारबाजी, काठी, लाठी याची प्रात्यक्षिके बार्शी येथील माधवराव देशमुख व त्यांच्या टीम ने सादर केली. तसेच डॉल्बी वर केवळ धांगडधिगा न करता देशभक्ती ची गाणी लावत उपस्थित सर्वच नागरिकांच्या अंगात उत्साह संचारला होता.



दहीहंडीसाठी खास रेनडान्स ची सोय करण्यात आली होती. तर उत्सव ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची डिजीटल व स्क्रिन सर्वांना आकर्षित करत होते. त्याच बरोबर मोठ्या स्क्रिन वर युवा प्रतिष्ठान ने केलेल्या विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची माहिती देणारी चित्रफीत ही लावण्यात आली होती. नेहमी प्रशासनाला सहकार्य करणारी भूमिका बजावत या बार्शी ही पोलीस प्रशासनाने दिलेल्या वेळेच्या आर्धा तास दहीहंडी उत्सव पूर्ण करण्यात आला.

युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडी उत्सवासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन गायकवाड, अक्षय चव्हाण, बिट्टू बारंगुळे, दयानंद धुमाळ, अण्णा साळुंखे, दिपक नवले, मनू चव्हाण, केतन वायचळ, ओंकार वायचळ,सोहम वायकुळे, नागेश सुरवशे,प्रथमेश पाटील, प्रशांत घोडके, अभिषेक गवळी,वैभव गरड,आकाश चव्हाण, दिपक भुजबळ, आकाश गाडे सोनू नवले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम आयोजनासाठी तारा इलेक्ट्रॉनिक बार्शी यांचे विशेष सहकार्य लाभले.